दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक २२९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.१९ नोव्हेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## निलंबित पोलीस अधिकारी सचिन वाझेला कोर्टाने दिला जामीन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कथित १०० कोटी वसुली प्रकरणी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना जामीन मिळाला त्याच खटल्यात निलंबित पोलीस अधिकारी सचिन वाझेला पीएमएलए कोर्टानं जामीन मंजूर केला आहे. परंतु दिलासा मिळूनही वाझे जेलबाहेर येऊ शकत नाही. अद्यापही त्याच्यावर २ खटले सुरू आहेत. या दोन्ही प्रकरणात सचिन वाझेला जामीन मिळाला नाही. त्यामुळे सचिन वाझेला जेलमध्येच राहावे लागणार आहे.

शुक्रवारी झालेल्या सुनावणीत न्या. आरएन रोकडे यांनी म्हटलं की, तपासावेळी आरोपीला अटक होऊ शकत नाही. त्यामुळे पीएमएलए कलम ४५ लागू होत नाही. अनिल देशमुख यांना याप्रकरणी जामीन मिळालाय तीच भूमिका सचिन वाझे सुनावणीत आहे. वाझेला जामीन देऊ शकतो. यावेळी ईडीच्या वकिलांनी सचिन वाझेच्या जामिनाला विरोध केला परंतु ईडीची मागणी कोर्टाने फेटाळून लावली. वाझेच्या जामीन अर्जावर १५ नोव्हेंबरला सुनावणी झाली होती. आज १८ नोव्हेंबरला कोर्टाने निकाल सांगितला.

# एसटीच्या ताफ्यात येणार ५ हजार इलेक्ट्रीक आणि २ हजार डिझेल गाड्या

## ‘एसटी’चा चेहरामोहरा बदलून प्रवाशांना दर्जेदार सेवा पुरवा : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एस.टी. ताफ्यात भाडेतत्वावर पाच हजार इलेक्ट्रिक तसेच दोन हजार डिझेल बसगाड्या खरेदी करण्यात येणार आहेत. त्याशिवाय डिझेलवरील पाच हजार बसगाड्यांचे टप्प्या-टप्प्याने ‘एलएनजी’ मध्ये रुपांतर करण्यास आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील संचालक मंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. दरम्यान, महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या एसटीचा चेहरामोहरा बदलणे आवश्यक असून स्वच्छता-टापटीपपणा ठेवून गाड्यांची निगा राखा आणि राज्यातील जनतेला दर्जेदार सेवा पुरविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी आज दिले.**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संचालक मंडळाची ३०२ वी बैठक आज सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन- नैनोटिया, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने, कामगार आयुक्त सुरेश जाधव, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांचेसह एसटी महामंडळ, परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात ५ हजार १५० इलेक्ट्रिक बसेस भाडेतत्वावर घेण्यात येणार आहेत, यापूर्वीच्या बैठकीत दोन हजार बसेस घेण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यामध्ये वाढ करून ५ हजार१५० इलेक्ट्रिक बसेस घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी यावेळी मान्यता दिली. या बसगाड्या घेण्यासाठी आशियाई विकास बँककडून कर्ज घेण्यासही मुख्यमंत्र्यांनी तत्वतः मंजुरी दिली आहे. इलेक्ट्रिक बसेस या वातानुकुलित असल्याने त्याचे सध्याच्या वातानुकूलित बसेस पेक्षा तिकिटदर कमी ठेवून सर्वसामान्यांचा प्रवास सुखकर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिल्या.


सीएनजी बसेससाठी चेसिस उपलब्ध होत नसल्याने आणि सीएनजी पंपांची कमी संख्या पाहता सीएनजीऐवजी दोन हजार डिझेल बसगाड्या एसटीच्या ताफ्यात घेण्यास आणि पुणे व सांगली विभागाकरिता १८० बसगाड्या भाडेतत्वावर घेण्यासही यावेळी मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली.

डिझेलवर धावणाऱ्या पाच हजार बसगाड्यांचे लिक्विफाईड नॅचरल गॅस (एलएनजी) इंधनामध्ये रुपांतरण करण्यात येणार आहे. यामुळे डिझेलच्या प्रचलित दरापेक्षा २० ते २५ टक्के कमी दराने एलएनजीचा पुरवठा होणार आहे. शिवाय संपूर्ण बस वातानुकुलित असल्याने कमी पैशांमध्ये प्रवाशांना प्रवास करता येईल. हे काम पुरवठादार कंपनीकडून करण्यात येणार असून सुरुवातीला यात महामंडळाला कोणतीही गुंतवणूक करावी लागणार नसल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## इर्टीगा कारला भीषण अपघात ; ५ ठार

**दै.रायगड नगरी । खोपोली**

पुण्याकडून मुंबईकडे जाणारी इर्टीका कार (एम.एच.१४ ईसी ३५०१) मुंबई पुणे द्रुतगती (एक्सप्रेस वे) महामार्गावर ढेकू गावाच्या हद्दीत किलोमीटर ३७.०० येथे आली असता चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कारची अज्ञात वाहनाला मागून धडक बसली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार कारमध्ये चालकासह आठ प्रवासी असल्याचे सांगण्यात आले. हे सर्व प्रवासी वेगवेगळ्या ठिकाणाहून मुंबईकडे जाण्यासाठी कारमधून प्रवास करीत होते. ही धडक एवढी जबरदस्त होती की त्यामध्ये प्रवास करणाऱ्या चार जणांचा जागीच मृत्यू झाला. तर एक महिला किरकोळ जखमी झाली असून चार जणांना गंभीर इजा झाल्याने त्यांना एमजीएम रुग्णालय कामोठे येथे दाखल करण्यात आले आहे. या दरम्यान त्यातील एक जणांचा मृत्यू झाला असल्याचे समजते. तसेच चालक आणि इतर दोघाजणांवर उपचार सुरू आहेत.



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार रात्री ११ वाजून ४० मिनिटांच्या दरम्यान हा अपघात झाला. आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, बोरघाट वाहतूक पोलीस, खोपोली पोलीस, डेल्टा फोर्स, लोकमान्य रुग्णालय आणि अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी यावेळी मदत कार्य केले. हा अपघात खोपोली पोलीस स्टेशनच्या हद्दीत झाला असून अपघाताची माहिती मिळताच खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला, खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार, पोलीस उपनिरीक्षक योगेश भोसले आदींनी चौकशी सुरू केली आहे.

या अपघातामध्ये अब्दुल रहमान खान (३२ वर्षे) घाटकोपर. अनिल सुनिल सानप. वसीम साजिद काझी, रा.राजापूर, जि. रत्नागिरी. राहुल कुमार पांडे (वय-३० वर्षे) फ्लॅट न.-६०५, रिद्धेश्वर हौ. सो. कामोठे, नवी मुंबई. आशुतोष नवनाथ गांडेकर (२३ वर्षे). अशोक धर्मा चाळ, म्हातारपाडा, अंबोली, अंधेरी(प), मुंबई. हे मृत्यूमुखी पडले आहेत. तर मच्छिंद्र आंबोरे (वय ३८ वर्षे) चालक. अमीरउल्ला चौधरी. दिपक खैराल. अस्फीया रईस चौधरी (२५ वर्षे) कुर्ला, मुंबई. हे जखमी झाले आहेत.

## तारा गावाजवळ ऑडीमध्ये सापडला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल-पेण रोडवरील तारा गावच्या हद्दीत नारायण राणे यांच्या फार्म हाऊसजवळ एका लाल रंगाच्या ऑडि गाडीमध्ये मृतदेह असल्याचे दिसून आल्याने खळबळ माजली आहे.

गाडी क्रमांक एम एच १४ जीए ९५८५ ही गाडी कागदोपत्री पुणे जिल्ह्यातील तेजस प्रकाश साळवे यांच्या मालकीची दिसत आहे. सदर गाडी तारा गावच्या हद्दीत नारायण राणे यांच्या फार्म हाऊस समोर गेल्या २ दिवसापासून उभी आहे. या गाडीत एका पुरुषाचा मृतदेह असून त्याने अंगावर टीशर्ट, जीन्स पॅन्ट घातलेली असून पायात स्पोर्ट्स शूज आहेत.

सापडलेला मृतदेह नक्की कोणाचा आहे. याबाबत पोलिसांकडून तपास केला जातोय.



मात्र ऑडी सारख्या लक्झरी कारमध्ये मृतदेह सापडल्याने ही हाय प्रोफाइल केस असल्याचे नागरिकांकडून बोललं जातंय.

## भाजपाला द्वेषाचे पीक आणून जाणीवपूर्वक महाराष्ट्रामध्ये शांतता नांदू द्यायची नाही : सुषमा अंधारे



**दै.रायगड नगरी । कर्जत**

पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांना धडा शिकवायचा आहे. मुंबई भारतीय जनता पक्षाला वाटतंय ही देशाची आर्थिक राजधानी आहे ती त्यांना लुटायची ही आहे,मुंबई देशाची छोटी प्रकृती आहे, अस्मिता आहे, मुंबईला महाराष्ट्रा पासून तोडून गुजरातला जोडायची आहे व कोकणातील सिंधुदुर्गचा भाग गोव्याला जोडायचा हीच खरी रणनीती भाजपची आहे. देवेंद्र एक प्रकारचे कुटील राजकारण करीत आहेत. निवडून आलेल्यांचे राज्य सत्तेत असते. निवडून आलेले फोडून राज्य स्थापन करायची पद्धत नाही. भाजपच्या असुरी सत्ताकारणाला रोखण्यासाठी मी विधिवत शिवसेनेत प्रवेश केला आहे, पळून जाऊन नाही. किरीट सोमय्या भाजपसाठी किती फिरतात त्यांना खरे तर भाजपने मंत्री केले पाहिजे. तुमच्यात येणाऱ्यांना तुम्ही मंत्री करता मग तुमच्यातल्यांना का करीत नाहीत. भाजपाला द्वेषाचे पीक आणून जाणीवपूर्वक महाराष्ट्रामध्ये शांतता नांदू द्यायची नाही मात्र महाराष्ट्रच त्यांना पुरून उरेल असे स्पष्ट प्रतिपादन शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी येथे कर्जत मध्ये केले.

कर्जत मधील रॉयल गार्डनच्या खुल्या रंगमंचावर शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) यांच्या वतीने नव्याने बांधण्यात आलेल्या ’शिवालय’ कर्जत विधानसभा मतदार संघ शिवसेना मध्यवर्ती संपर्क कार्यालयाच्या उदघाटन सोहळ्याचे आणि शिवसंवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला अभिवादन करून शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या हस्ते शिवालय कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी उपनेते अल्ताफ शेख, जिल्हा संपर्क प्रमुख बबन पाटील, जिल्हा महिला संघटक सुवर्णा जोशी, जिल्हाप्रमुख मनोहर भोईर, उप जिल्हाप्रमुख नितीन सावंत, सह संपर्क प्रमुख भाई शिंदे,माजी नगराध्यक्ष प्रेरणा सावंत, माजी सभापती सुजाता मनवे, अनिता पाटील, सल्लागार नवीन ढाकवळ आदी उपस्थित होते. कर्जत तालुकाप्रमुख उत्तम कोळंबे व खालापूर तालुकाप्रमुख एकनाथ पिंगळे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

अंधेरे पुढे म्हणाल्या मी प्रवेश केला तेंव्हा शिवसेना उभी करण्यासाठी संधी द्या. असे उद्धव ठाकरेंना सांगितले. माझ्यावर माझ्या चळवळीतील माणसे टीका करीत होती. परंतु मी त्यांना आपली माणस

.../२

## बाळासाहेबांची शिवसेना-पनवेल महानगर तर्फे राहुल गांधीच्या विरोधात जोडे मारो आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र मध्ये सुरू असलेल्या भारत जोडो यात्रेच्या दरम्यान राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बद्दल आक्षेपार्ह विधान केल्याच्या प्रकरणावरून आज पनवेलमध्ये शिंदे गटाचे महानगरप्रमुख माजी नगरसेवक ॲडव्होकेट प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या नेतृत्वात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तीव्र आंदोलन करण्यात आले.

प्रथमेश सोमण यांच्यासह पनवेल संपर्कप्रमुख रामदास शेवाळे, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे, महिला आघाडीच्या महानगर संघटिका सुलक्षणा जगदाळे, पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनवणे, खारघर शहरप्रमुख प्रसाद परब, कामोठे शहर प्रमुख सुनील गोवारी, नवीन पनवेल शहर प्रमुख शिवाजी थोरवे यांच्यासह





महानगरातील इतर प्रमुख पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राहुल गांधींच्या विरोधात घोषणाबाजी करत त्यांच्या प्रतिमेला चपलांचा हार घालण्यात आला व जोडे मारून त्यांनी सावरकरांबद्दल केलेल्या विधानाचा निषेध व्यक्त करण्यात आला.

या समयी पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या कडे अधिकृत निवेदन देऊन काँग्रेसची महाराष्ट्रात सुरू असलेली भारत जोडो यात्रा लवकरात लवकर थांबावी अशी मुख्यमंत्र्यांकडे मागणी करण्यात आली.

तहसीलदार विजय तळेकर यांनी या निवेदनाची दाखल घेत शासनदरबारी पाठवणार असल्याचे आश्वासन दिले.

## जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांचा राहुल गांधींबरोबर संवाद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रीय काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा महाराष्ट्र राज्यात नांदेड येथे दाखल झाल्यापासून रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत हे त्यांच्या शेकडो पदाधिकाऱ्यांसह भारत जोडो यात्रेत सहभागी झाले आहेत. दि. १७ नोव्हेंबर रोजी वाडेगाव ता. अकोला येथे महेंद्र घरत यांना राहुल गांधी यांच्या सोबत ७ मिनिटे संवाद साधण्याची संधी मिळाली. यावेळी प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोलेही सोबत होते. स्व. बॅ. अंतुले साहेबांच्या रायगड जिल्ह्याची जबाबदारी महेंद्र घरत यांच्यावर दिली आहे असे नानाभाऊ पटोलेंनी राहुलजी गांधी यांना सांगितले. तसेच महेंद्र घरत यांनी रायगड काँग्रेसला नवसंजीवनी दिल्याचे नानाभाऊ पटोलेंनी राहुलजींना सांगितले.

रायगड जिल्हा काँग्रेस तर्फे वाडेगाव ता. अकोला येथे दि. १७ नोव्हेंबर रोजी पदयात्रेच्या मार्गावर कोळी नृत्याचे सादरीकर करण्यात आले. राहुल गांधी यांनी याची

.../२

## गावठाण जांभळपाडा गावातील विद्युत पुरवठा १५ तास खंडित

**दै.रायगड नगरी । उरण**

चिर्ले ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण, जांभळपाडा गा-वातील रहिवाशांना करण्यात येत असलेला विद्युत पुरवठा हा मालवाहू कंटेनर ट्रेलरच्या धडकेने खंडित झाल्याची घटना गुरुवारी ( दि१७) सायंकाळी ५ च्या सुमारास घडली.सुदैवांनी कोणत्याही प्रकारची जीवित व वित्त हाणी घडली नाही.मात्र विद्युत वाहक लोखंडी पोल कंटेनर ट्रेलरच्या धडकेने रस्त्यावर कलंडल्याने दोन गावातील विद्युत पुरवठा हा १५ तास खंडित झाल्याने रहिवाशांना रात्र जागून काढावी लागली आहे.

चिर्ले,वेश्वी आणि दिघोडे ग्रामपंचायत हद्दीतील गव्हाण फाटा ते चिरनेर या रहिवाशांच्या रहदारीच्या रस्त्यालगत शासनाच्या नियमांची पायमल्ली करून मोठ्या प्रमाणात मालाची हाताळणी करणारे कंटेनर यार्ड उभी राहिली आहेत.त्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी बरोबर अपघाताची समस्या बळावली आहे.त्यातच भरधाव वेगाने जाणाऱ्या मालवाहू कंटेनर ट्रेलरने गुरुवारी ( दि१७) सायंकाळी ठिक ५ च्या सुमारास रस्त्यालगत असलेल्या विद्युत वाहक पोलला धडक दिल्याची घटना घडली.या अपघातात विद्युत वाहक लोखंडी पोल रस्त्यावर कलंडला

.../२

# निर्ढावलेपण थांबवा!

गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकप्रतिनिधींना उमेदवारी मिळू नये, अशी अपेक्षा सर्वांकडून व्यक्त होते. न्यायालयांनी तसे संकेत दिलेच आहेत. मतदारांचे मत याहून वेगळे नाही. राजकीय गुन्ह्यांचा आलेख मात्र तरीही वाढतो. त्याचा वेगही मोठाच. आपण निवडून दिलेला मोहरा 'अडकला' ही बोच सामान्यांना छळते. निवडून येणे या एकमेव निकषामुळे उमेदवाराच्या चारित्र्याकडे राजकीय पक्ष साफ दुर्लक्ष करतात. एरवी जाहीर सभांमधील सर्वपक्षीय कंठशोष विजयाच्या शक्यतेपुढे नेमका धाराशायी होतो. सध्याच्या लोकसभेतील ४३ टक्के खासदारांवर गुन्हेगारी खटले नोंदविले आहेत, असे समजते. लोकप्रतिनिधींच्या गुन्ह्याची ही ताजी आकडेवारी सुन्न करणारी आहे. केवळ मतदारांच्या आत्मचिंतनाने हा विषय संपेल असे समजण्याचे कारण नाही. अलीकडील राजकारणात नीतिमत्ता आणि आदर्शांचा विस्तार होण्याऐवजी सौदेबाजी आणि गुन्हेलिप्तता वाढली आहे. लोकप्रतिनिधींबाबत दिवसेंदिवस वाढणारे संशयाचे धुके सामूहिक सुरक्षिततेला नख लावणारे ठरेल. राजकारणातील गुन्हेगारी हा तसा पूर्वापार चिंतेचा विषय आहे. 'माणसाचे व्याकरण चुकले तर चालेल, आचरणात विसंगती नको',असे म्हटले जाते. अशा सर्व सुभाषितांच्या अंमलबजावणीचे घाऊक कंत्राटही सामान्यजनांवर थोपविले जाते. राजकारणी त्यातून चतुराईने सहीसलामत निसटतात. 'राजकारणात सारेच क्षम्य' हे सोयीस्कर आवरण ओढण्यात नेतेमंडळी पुढे असतात. समाजकारणासाठी राजकारणात आल्याचा दावा बव्हंशी नेते करतात. त्यांची वर्तणूक मात्र साधेपणाला साजेशी नसते. विशेषाधिकार मिळाल्याचे त्यांच्या वागण्या-बोलण्यातून झळकते. सारेच लोकप्रतिनिधी आरंभी नम्र असतात असा सूर मतदारांतर्फे आळविला जातो. याचाच अर्थ,अनुभवाअंती येणाऱ्या पुढाऱ्यांच्या निर्ढावलेपणावर जनतेचा रोष असतो. तात्कालिक लाभाची बरेचदा सामान्यांनाही भुरळ पडते. राजकीय फायद्याचा परीघ सामान्यांनाही हवाहवासा वाटू लागतो. राजकारण्यांची गुन्हेलिप्तता वाढण्यास त्यातूनच मदत मिळते. हे संकट किती वाढणार याची जाणीव अलीकडील न्यायालयीन माहितीतून आली. ईडी म्हणजेच सक्तवसुली संचालनालयाने आरोपी केलेल्या देशातील लोकप्रतिनिधींमध्ये ५१ आजी-माजी खासदार आणि ७१ आमदारांचा समावेश आहे. अशा राजकारण्यांविरोधात सीबीआयने नोंदविलेले १२१ खटले प्रलंबित आहेत. सर्वोच्च न्यायालयापुढे ही माहिती आल्याने खळबळ उडाली आहे. ५१ आजी-माजी खासदारांना ईडीने अवैध सावकारी प्रतिबंध कायद्यांतर्गत आरोपी ठरविले. त्यापैकी १४ विद्यमान खासदार आहेत. ३७ माजी असून पाच खासदारांचे निधन झाले आहे. ३४ विद्यमान व ७८ माजी आमदार सीबीआयच्या प्रकरणांमध्ये अडकले आहेत. ९ जण दिवंगत झाले आहेत. खासदारांविरुद्ध प्रलंबित असलेल्या 'सीबीआय' प्रकरणांची संख्या ३७ आहे. ज्यांना आपले समजून निवडून देतो, त्यांची अशी 'कर्तबगारी' बघून मतदारांचाही हिरमोड होईल. गुन्हे मागे घेण्याच्या बातम्यांचे स्वागत करण्यात सामान्यजनच पुढे असतात. विविध सामाजिक आणि राजकीय आंदोलनांमुळे दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याचा निर्णय राज्याच्या मंत्रीमंडळाने अलीकडेच घेतला. ३० जून २०२२पर्यंतच्या अशा खटल्यांना विराम मिळेल. आर्थिक घोटाळ्यांमध्ये मात्र असा दिलासा कदापि मिळू नये याची खबरदारी राजकीय पक्षांनी घ्यायला हवी. तशी हमीही मतदारांना द्यायला हवी. ७१ विद्यमान व माजी आमदारांविरुद्ध अवैध सावकारीचे खटले प्रलंबित आहेत. त्यातील ४८ प्रकरणांची चौकशी सुरू आहे. तुटपुंज्या कमाईमुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र संपायला तयार नसताना अवैध सावकारीमधील लोकप्रतिनिधींचा समावेश चीड आणणारा ठरतो. सामान्यांच्या दु:खमुक्तीसाठी प्रयत्न करण्याचे सोडून स्वत:चेच घर भरण्याचा आमदार-खासदारांचा छुपा अजेंडा निखंदून काढायला हवा. अवैध सावकारीत समावेश असलेल्यांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढण्याची भाषा ज्या प्रदेशाने बघितली, त्या महाराष्ट्रात लोकप्रतिनिधींचा सावकारीतील समावेश चव्हाट्यावर आणायला हवा. या निमित्ताने चर्चेला यावा असा आणखी एक मुद्दा राजकारणातील नवश्रीमंतांचा आहे. त्याकडे व्यवस्थेची करडी नजर हवी. अवांतर 'उद्योगां'मुळे थेट कारागृहांची वारी करून आल्यानंतरही अपकीर्ती झाल्याची खंत कथित नेत्यांमध्ये जाणवत नाही, ही वेदनादायी बाब आहे. तुरुंगवारीनंतरचे सत्कार सोहळेदेखील आजकाल जनतेने स्वीकारले आहेत. पक्षनिष्ठेच्या अशा निलाजऱ्या प्रदर्शनाचा विरोध व्हायला हवा. अशा स्वागतशील उपक्रमांतून पुन्हा लोकस्वीकृती मिळविल्याचा भास उभा करण्याची कला अनेक महनीयांनी शिकून घेतली आहे. राजकीय तडजोडींकडे दुर्लक्ष करणाऱ्या समंजस सामान्यांनी आर्थिक घोटाळ्यांमधील राजकीय सक्रियताही ओळखायला हवी. हे मुद्दे निवडणुकीचे निकष बनविण्याची परिपक्वता बाणवली तरच राजकीय गुन्हेगारीकरण थोपविता येईल. अन्यथा अप्रामाणिक नवश्रीमंतांचे आलेख चाळण्याखेरीज मतदारांच्या हाती काही उरणार नाही.

# योगेश जाधव यांच्या पुढाकाराने अनेक विकास कामे मार्गी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या माध्यमातून मागील पाच वर्षात अनेक विकास कामे मार्गी लागली असून त्यासाठी समितीचे अध्यक्ष योगेश जाधव यांनी सातत्याने पाठपुरावा करून पर्यटकांना अभिप्रेत असणारी महत्वाच्या पॉईंट्स वरील सुरक्षा व्यवस्था त्याचप्रमाणे अत्यावश्यक सुविधा म्हणून जी पाच वर्षांपूर्वी बायोटॉयलेट कार्यान्वित करण्यात आली होती त्याचाही सारासार विचार करून अद्ययावत सुविधा उपलब्ध व्हा-वी यासाठी शर्थीचे प्रयत्न करत आहेत. एकंदरीत वनव्यवस्थापन समितीला वाहन कराच्या माध्यमातून जे काही भरीव उत्पन्न प्राप्त होते त्याचा सदुपयोग योगेश जाधव यांनी विकास कामांसाठीच केल्यामुळे पर्यटकांसह स्थानिक पातळीवर समाधान व्यक्त होत आहे.

यापूर्वी सुध्दा वनव्यवस्थापन समिती कार्यान्वित होती परंतु चांगल्या दर्जाची कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले गेले नाहीत. परंतु मागील पाच वर्षांपूर्वी या समितीची धुरा योगेश जाधव यांच्या खांद्यावर आल्याने त्यांनी आपल्या पदाला न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या परीने निश्चितच प्रयत्न केलेला स्थानिकांना दिसत आहे. अनेक महत्त्वाच्या पॉईंट्स वर ज्या ज्या ठिकाणी धोकादायक जागा आहेत त्याठिकाणी लोखंडी संरक्षक रेलिंग लावून अपघाताचे प्रमाण रोखले आहे. माथेरानची खरी ओळख इथली गर्द वनराई आहे. आणि हीच वनराई कायमस्वरूपी अबाधित राहिली तरच याठिकाणी पर्यटकांची संख्या वाढणार आहे ही बाब ओळखून योगेश जाधव यांनी समितीच्या माध्यमातून दरवर्षी पावसाळ्यात मोठया प्रमाणावर विविध पॉइंट्स वर विविध प्रकारच्या रोपांची लागवड (वृक्षारोपण) केल्यामुळे लुईझा पॉईंट, एको पॉईंट त्याचप्रमाणे गारबट पॉईंट याठिकाणी वृक्षारोपण केल्यामुळे त्या त्या भागात गर्द झाडी पहावयास मिळत आहे. आणि पर्यटक सुध्दा ह्या गर्द वनराईचा आनंद लुटताना दिसतात. माथेरान मध्ये मोठया प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असते त्यामुळे ज्या ज्या पॉइंट्स वर पर्यटकांच्या सोयीसाठी बायोटॉयलेटची व्यवस्था करण्यात आली आहे त्याठिकाणी अतिवृष्टीमुळे झाडांची फांदी टॉयलेट वर पडून त्या टॉयलेटची काहीशा प्रमाणात वाताहत झाली होती.त्यामुळे काहीवेळा पर्यटकांना याचा वापर करता येत नव्हता सदरची टॉयलेट दुरुस्तीची कामे सुध्दा युद्धपातळीवर सुरू होत आहेत.मुख्य म्हणजे नगरपरिषदेच्या विकास कामांत वनव्यवस्थापन समितीचे नेहमीच सहकार्य राहिलेले असल्याने नगरपरिषदेच्या माध्यमातून जी काही रस्त्यांची कामे असोत की वनखात्याच्या जागेतील मोटार वाहन पार्किंग असो त्याठिकाणी या समितीने कोणत्याही प्रकारचा व्यत्यय न आणता केवळ माथेरान हे पर्यटनस्थळ विकासाच्या दिशेने जात आहे ही बाब लक्षात घेऊन योगेश जाधव यांनी सकारात्मक भूमिका पार पाडली आहे.अन्यथा होणारी सर्वच कामे आजही प्रलंबित राहिली असती यात शंकाच नाही. परंतु माथेरान ह्या गावातील काही विघ्नसंतोषी मंडळी ही नेहमीच काहींनाकाही कारणास्तव आपला आर्थिक स्वार्थ साधण्यासाठी विकासाला विरोध करण्यात अग्रेसर असतात त्यामुळेच हे गाव आजही अनेक महत्वाच्या कामांपासून पिछाडीवर आहे.वनव्यवस्थापन समितीने सहकार्य केल्यामुळे ही सर्व कामे मार्गी लागली आहेत.तसेच दस्तुरी नाक्यावरील वाहन पार्किंग मध्ये काहीवेळा गाड्यातील पेट्रोल तसेच किमती वस्तूंच्या चोर्यांचे प्रमाण वाढत चालले होते त्यावेळी एपीआय शेखर लव्हे यांच्या सूचनेनुसार योगेश जाधव यांनी ताबडतोब त्याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे चोऱ्यांवर आवर घालणे शक्य झाले आहे. आणि ही कामे पूर्ण करण्यासाठी समितीचे अध्यक्ष योगेश जाधव यांच्या सारखा निस्वार्थी व्यक्तिमत्त्व समितीला लाभल्याने या सर्व विकासात्मक सर्व बाबी अगदी सहज शक्य झाल्या आहेत.



# खा.सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील विविध विषयांचा आढावा बैठक संपन्न

## लोकाभिमुख योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या दिल्या सूचना

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील विविध विकासकामांविषयी संबंधित विभागांच्या विभाग स्तर / जिल्हास्तरावरील अधिकारी तर काही राज्यस्तरीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृह येथे खासदार सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील विविध विकासकामांविषयीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने लोकाभिमुख, लोकोपयोगी विकासकामे गतीने पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत, असे आवाहन उपस्थितांना केले.



यावेळी आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, सर्व प्रांताधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी, जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक जी.एस. हरळय्या, समाजकल्याण सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव, जिल्हा कृषी अधीक्षक उज्ज्वला बाणखेले, कृषी उपसंचालक दत्तात्रय काळभोर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, राजेंद्र भालेराव, शुभांगी नाखले, जिल्हा खनिकर्म अधिकारी रोशन मेश्राम, जिल्हा कौशल्य विकास अधिकारी अमिता पवार, जिल्हा प्रशासन अधिकारी शाम पोशट्टी, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक विजयकुमार कुलकर्णी, अलिबाग पोस्ट ऑफिस, राष्ट्रीयकृत बँक व्यवस्थापक, कोकण रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, आरसीएफ, गेल, महावितरण, भारत संचार निगम लिमिटेड, जिओ लिमिटेडचे तसेच इतर विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत खासदार सुनिल तटकरे यांनी पंतप्रधान स्वयंरोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री फसल विमा योजना (फळ पिक विमा योजनेंतर्गत आंबा-काजू सारख्या फळ पिकांच्या विमा हप्त्यात तफावत), जल जीवन मिशन योजना व आराखडा पायाभूत सुविधा कार्यक्रम (महामार्ग) व जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीय महामार्ग यांचे प्रलंबित भूसंपादन व इतर विषय, पायाभूत सुविधा कार्यक्रम रेल्वे व कोकण रेल्वे भूसंपादित प्रलंबित व प्रकल्पग्रस्तांचे विषय, अलिबाग येथे पासपोर्ट कार्यालय उभारणे, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण व शहरी), पायाभूत सुविधा कार्यक्रम (दूरसंचार) व डिजिटल इंडिया पब्लिक इंटरनेट एक्सेस प्रोग्राम, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना विस्तारीकरण व प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, आरसीएफ विस्तारीकरण प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न व नुकत्याच झालेल्या स्फोटाबाबत, दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना, कृषी वीज पंप जोडणे व जिल्हा नियोजनाच्या प्रलंबित महावितरणच्या कामाबाबत, संसद आदर्श ग्राम योजना व संसद सदस्य स्थानिक क्षेत्र विकास योजना या योजनांच्या अंमलबजावणीच्या सद्य:स्थितीबाबत आढावा घेतला.

या बैठकीच्या अनुषंगाने खासदार तटकरे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की, शासकीय योजनांचा लाभ जास्तीत जास्त गरजूंना द्यावा, महिलांना प्राधान्य द्यावे, अनुसूचित जाती-जमातीच्या लाभार्थ्यांना अधिकाधिक लाभ मिळवून द्यावेत, केंद्र व राज्य शासनाच्या तसेच खादी ग्रामोद्योग विभागाच्या योजनांना अधिकाधिक प्रसिद्धी द्यावी, शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, कोणत्याही लाभार्थ्याला क्षुल्लक कारणांवरून योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित ठेवू नये, अधिकारी-कर्मचाऱ्यांनी संवेदनशीलतेने काम करावे. बँकांच्या अधिकाऱ्यांनी विविध योजनांच्या माध्यमातून आलेल्या प्रस्तावांना कमीत कमी कालावधीत मंजूरी देवून गरजू लाभार्थ्याला सहकार्य करावे. बैठकीच्या शेवटी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.

# मोबाईल चोरास मुरुड पोलिसांकडून अटक

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्ह्यातील विविध भागात मोबाईल चोरीच्या घटना वाढत होत्या.परंतु अलिबाग येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण खात्याने सराईत मोबाईल व अन्य इलेक्ट्रिकल वस्तू चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक करण्यात यश प्राप्त केल्यामुळे जिल्ह्यातील विविध ठिकाणी चोरी झालेल्या घटनांचा पर्दाफाश होत आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण खात्याने फरीद अक्रम कोकरे ( वय २८ वर्ष ) रोहा येथील खालचा मोहल्ला रहिवाशी असून त्याला अटक केली होती.याच युवकाचा मुरुड येथील चोरीच्या घटनेशी संबंध येत असल्याने याचा ताबा मुरुड पोलिसांना देण्यात आला होता. या युवकाने मुरुड शहरातील पेठ मोहल्लयातील वहिदा इस्माईल मिसरी यांच्या राहत्या घरातून घराचा दरवाजा उघडा व कोण नाही हे पाहून किमती मोबाईल चोरून नेला होता.याबाबतची रीतसर तक्रार दिनांक ६ नोव्हेम्बर २०२२ रोजी मुरुड पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली होती.घटनेतील आरोपी मिळताच मुरुड पोलीस ठाण्यात या युवकांविरुद्ध भा.द.वि कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.


Hon'ble Mujawar Sir Court
Advocate Swati Sinha
High Court Mumbai

**PUBLIC NOTICE**

IN THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE AT PANVEL TESTAMENTARY AND INTESTATE JURISDICTION SUCCESSION CERTIFICATE APPLICATION
NO. 871 OF 2022
Exh : 8/D
N.D.23/12/2022

1) Prashant Vasant Parte
Pink City Room No.707
Building No.03
Ambernath (East)-421501 Applicant

That the above named applicant's father and deceased Late Shri Vasant Hashaba Parte died on 7th MAR 2020. Applicant is only son of the deceased and residing on the above address mentioned in the cause title.

**Description of the immovable property :- With reference to the property mentioned below :-**

**FLAT 301-ANCHIT HOMES CHS, PLOT NO.77, SECTOR NO.22, KAMOTHE, TAL-PANVEL, DIST-RAIGARH JOINTLY BELONGING TO THE LATE SHRI VASANT HASHABA PARTE DECEASED AND APPLICANT PRASHANT VASANT PARTE.**

That the Applicant has truly set forth the ownership of referred immovable property which the certificate is applied for. The succession Certificate is required for the purpose of transferring the property from joint ownership to applicant's name. At present the property is of joint ownership of the deceased and his only son i.e. applicant.

Notice is hereby given that Late Shri Vasant Hashaba Parte expired on 7th MAR 2020. On behalf of my client Mr.Prashant Parte, only son of the deceased, the undersigned advocate hereby invites claims or objection from any other heir/s or objector/s for the transfer of the immovable property in the name of claimant within period of 30 days from the publication of this notice, with copies of proofs to support the claim / objection. If no claims / objections are received with in the period prescribed above, my client shall be at liberty to deal with the transfer of ownership prescribed by law.

On 18 Nov 2022 at Panvel, Dist Raigarh

Court Seal

Sd/-
Asst.Suprident.
Civil Court Panvel


पृष्ठ क्र.१ वरुन...

## भाजपाला द्वेषाचे पीक आणून जाणीवपूर्वक महाराष्ट्रामध्ये शांतता नांदू द्यायची नाही

म्हणून समजावून सांगीतले. परंतु तुम्ही रात्री पळून गेलात. मी संविधानाची चौकट काय आहे ते सांगत असते. जे गेलेत त्यांच्यात हिम्मत असेल तर समोर या. समान नागरी कायदा असावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे म्हणणे होते. वडिलांच्या इस्टेटीत मुलीला वाटा मिळावा, नवऱ्याच्या इस्टेटीत बायकोचा वाटा, अविवाहित महिलेला दत्तक मूल घेणे, घटस्फोटा नंतरही बायकोला पोडगी मिळावी. हेच समान नागरी कायद्यात आहे. आम्ही मोदी आणि शहांच्या मुजोरीला भीक घालत नाही. भाजपकडे कोण आहेत? त्यांनी आमची तयार पर्सलेच घेतली आहेत. सध्या भाजप मध्ये आहेत त्यांनी कोणकोणत्या पक्षात किती उड्या मारल्यात हे पहिले बघा, हमारी बिल्ली हमसे मॅव. शिवसेना सोडून पळालेल्या ५० आमदारांनी पक्ष प्रमुख यांचा नाही तर या आमदारांना ज्यांनी मते दिली त्या मतदारांचा विश्वासघात केला आहे.' त्यांनी आपल्या भाषणात नवनीत राणा, राज ठाकरे, आशिष शेलार आमदार महेंद्र थोरवे यांचाही खरपूस समाचार घेतला.

उपनेते अल्ताफ शेख यांनी मी नावाने मुस्लिम असलो तरी मी आधी महाराष्ट्रातील मराठा आहे, मग मुस्लिम आहे जे शिवसेना संपवायला निघालेत त्यांना मी सांगू इच्छितो महाराष्ट्राने आदिलशाही, निजामशाही, मोगलशाही संपवली. आता दिल्लीला बसलेल्या अमित शहाने इकडे फडणवीस नावाचा अफजलखान पाठवला आहे परंतु आम्ही त्यांची पळता भुई थोडी करू. तुम्ही जे गेलेत ती भाजपरूपी पुतना मावशी फक्त विषच ओकेल व तुम्हाला तुमची जागा दाखविल. आता निळा व भगवा एक झाला आहे. कितेही रंग आम्हाला चालतील सर्वांनी एकत्र येऊन त्यांची जागा दाखवा.' असे आवाहन केले. सुनील पाटील, उमेश गावंड, बाबू घारे, सुदाम पवाळी, एकनाथ पिंगळे यांनीही आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी माजी उपसभापती पंढरीनाथ राऊत, राजाराम शेळके, विलास सांगळे, परशुराम म्हसे, विजय गायकवाड, सारिका शेट्टे आदींच्या नेतृत्वाखाली काही कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांचे व्यासपीठावरील मान्यवरांनी स्वागत केले.

याप्रसंगी राजेश जाधव, संतोष पाटील, प्रथमेश मोरे, उपतालुका प्रमुख रामदास घरत, सुधाकर देसाई, सुरेश गोमरे, ज्ञानेश्वर भालीवडे, संपत हडप आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांचा राहुल गांधींबरोबर संवाद

दखल घेत कलाकारांना स्वतः हात करून जवळ बोलावून घेतले. यावेळी रायगड काँग्रेस तर्फे कोळी समाजाचे प्रतिक मच्छीमार बोट राहुलजींना भेट देण्यात आली. राहुलजींनी त्याचा सन्मानपूर्वक स्वीकार केला. रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांच्यासोबत जिल्ह्यातील दोनशे कार्यकर्ते व कोळी नृत्याने पदयात्रा दणाणून सोडली. पदयात्रेत त्या दिवशी रायगड जिल्ह्याचाच बोलबाला होता. जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या अकोला येथील पदयात्रेच्या नियोजनाचे सर्वत्र कौतुक केले.

## गावठाण जांभळपाडा गावातील विद्युत पुरवठा १५ तास खंडित

सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवित व वित्त हाणी झाली नाही.मात्र जवळ जवळ १५ तास गावठाण,जांभुळ पाडा गावातील रहिवाशांना करण्यात येत असलेला विद्युत पुरवठा खंडित झाला.त्यामुळे दोन्ही गावातील ७५ कुटुंबातील सदस्यांना रात्र जागून काढावी लागली आहे.

गव्हाण फाटा ते चिरनेर या रहिवाशांच्या रहदारीच्या रस्त्यावर वारंवार वाहतूक कोंडी ची समस्या निर्माण होत आहे.तसेच होणाऱ्या अपघातात निष्पाप प्रवाशी नागरीकांना नाहक आपले प्राण गमवावे लागत आहे.त्यात बेशिस्त कंटेनर ट्रेलर चालकांच्या लापरवाही मुळे रस्त्यालगत असलेल्या विद्युत वाहक लोखंडी पोलना धडक बसून विद्युत पुरवठा खंडित होत आहे.तरी प्रशासकीय अधिकारी वर्गाने अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी रायगड जिल्हा परिषद मा. सदस्य डॉ मनिष पाटील यांनी केली आहे.

# आ.प्रशांत ठाकूर यांच्या सौजन्याने 'भगवान बिरसा मुंडा चषक २०२२'



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महान जनजाती स्वातंत्र्य सेनानी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्ताने व राष्ट्रीय जनजाती गौरव दिना पनवेल तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन साजरा होत आहे. त्याअंतर्गत वनवासी कल्याण आश्रम आणि पनवेल तालुका भारतीय जनता पार्टी यांच्या माध्यमातून तसेच भारतीय जनता पार्टी रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सौजन्याने 'भगवान बिरसा मुंडा चषक २०२२' या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा १८ ते २० नोव्हेंबर दरम्यान गाढेश्वर मंदिर येथील भव्य मैदानात रंगणार आहे. या स्पर्धेचे उदघाटन भारतीय जनता पार्टीचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्याहस्ते शुक्रवारी करण्यात आले.

यावेळी वाजे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजेश भालेकर, दुदरे ग्रामपंचायतीचे उपसरपंच किशोर पाटील, वाजे ग्रामपंचायतीचे सदस्य पद्माकर वाघ, मालडुंगे ग्रामपंचायत सदस्य जनार्दन निरगुडा, दुदरे माजी उपसरपंच शांताराम चौधरी, भाजप जेष्ठ कार्यकर्ते विष्णू चौधरी, युवा कार्यकर्ते विकास भगत, गणेश पाटील, दिलीप पाटील, शत्रुघ्न उसाटकर यांच्यासह इतर मान्यवर पदाधिकारी आणि खेळाडू उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

### मांडुळ जातीच्या सापाची विक्री करणाऱ्यांविरोधात वनविभागाची कारवाई

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड तालुक्यातील मोहोत येथील सचिन सहदेव पवार यांच्याकडे सात महिन्यांपासून मांडुळ जातीचा साप ठेवला होता. त्या सापाची विक्री करणार असल्याची माहिती सिस्केप संस्था व आऊल्स संस्थेचे प्रतिनिधी यांनी महाड वनक्षेत्रपाल श्री.आर.बी.साहू यांना दिली. प्राप्त माहितीच्या आधारे महाड वनक्षेत्रपाल श्री.साहू यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह भिवघर–निगडे रस्त्यालगत दि.१६ नोव्हेंबर २०२२ रोजी सापळा लावून गस्त करीत असता सचिन सहदेव पवार (रा.मोहोत, ता.महाड, जि.रायगड) व महेश रमेश मालुसरे (रा.काळीज, ता.महाड, जि.रायगड) यांना मांडुळ जातीच्या सापाची विक्री करीत असताना रंगेहाथ पकडले. या कारवाईत त्यांच्याकडील २ मोबाईल, १ मोटार सायकल व १ जिवंत मांडुळ जातीचा साप ताब्यात घेण्यात आला.

या पार्श्वभूमीवर बिरवाडी वनपाल यांनी आरोपींच्या विरुद्ध वन्यजीव संरक्षण अधिनियम चे कलम ९, ३९, ४४ (अ), (४), ४८ (अ), ४९, ५१, ५२ नुसार परिमंडळ बिरवाडी रौ.गु.नं, बन्यजीव १/२०२२.२३ दि.१६.११.२०२२ अन्वये वनगुन्हा नोंद केला असून पुढील तपास चालू आहे, अशी माहिती रोहा उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत यांनी दिली आहे. ही कारवाई रोहा उपवनसंरक्षक अप्पासाहेब निकत व रोहा सहाय्यक वनसंरक्षक श्री.व्हि.बी.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आली.



# पोलादपूरच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वपक्षिय एकत्र आल्यास दक्षिण आफ्रिकेच्या धर्तीवर नियोजनबध्द प्रयत्न





**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

दक्षिण आफ्रिका खंडातील देश हजारो एकर जमिनी विनाशुल्क शेतीसाठी देत असल्याने तेथील एका देशात सूर्यफुलाची शेती करून ८ कोटी उत्पन्न यावर्षी घेतले. पोलादपूर तालुक्याच्या डोंगर–दऱ्यांची आठवण तेथील वातावरणात येत असते. पोलादपूर तालुक्यातील जमिनींचा वापर करून अशाप्रकारचे कृषी उत्प–ादन मोठ्या प्रमाणावर घेऊन शेतकऱ्यांना सधन करता येईल.पोलादपूर तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वपक्षिय एकत्र आल्यास दक्षिण आफ्रिकेच्या धर्तीवर नियोजनबध्द प्रयत्न करू अशी खुली ऑफर रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन तथा भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सर्वेसर्वा आमदार भाई जयंत पाटील यांनी दिली. बँकेच्या विन्हेरे नागांव येथील स्वमालकीच्या विशेष कक्ष शाखेचे उदघाटन आटोपून स्वमालकीच्या सुसज्ज इमारतीमध्ये पोलादपूर शाखेचे उदघाटन करण्यासाठी आले असता आ.जयंत पाटील बोलत होते.

याप्रसंगी काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष हनुमंत जगताप, पोलादपूरच्या नगराध्यक्षा सोनल गायकवाड, माजी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे व सुमन कुंभार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हाईस चेअरमन सुरेंद्र खैरे, संचालक एकनाथ गायकवाड, महाड कृषी उत्पन्न बाजार समितीचे वैभव चांदे व श्रीधर सकपाळ, प्रभारी मुख्यकार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, विन्हेरे विशेष कक्ष नागाव शाखाधिकारी नितीन चांदोरकर, पोलादपूर शाखाधिकारी संजीव जगताप, बिरवाडी शाखाधिकारी दिलीप तांबे आणि माणगाव विभागीय अधिकारी संजीव देशमुख आदी पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

पोलादपूर शहराच्या अंडरपास महामार्गामुळे जर तालुक्याचे नुकसान झाले असेल तर पोल–ादपूर शहरात महामार्गाच्या वरील भागात मोठ्या प्रकारचा व्यापारी व्यावसायिक उपक्रम राबवून कोकणाकडे जाणाऱ्या प्रवाशांना आणि वाहनांना वरच्या सर्व्हिसरोडवरून जाण्यासाठी आकर्षित करता येईल.

नगरपंचायतीच्या हद्दीतील जागा मिळाल्यास तिथेही रायगड बाजारसारखा भव्य प्रकल्प उभारता येईल, असे सांगून आ.जयंतभाई यांनी पोलादपूर तालुक्यासाठी सर्वाधिक विकासकामे पाटील परिवाराने केली आहेत. नारायण नागू पाटील यांच्यानंतर आमची पाचवी पिढी आज राजकारणात लक्ष्यवेधी आणि प्रभावी मांडणी करून जनतेच्या विकासासाठी प्रयत्नशील राहिली आहे. पुर्वी काँग्रेस आणि प्रजा समाजव–ादी अशी विचारसरणीचे लोक महाड व पोलादपूर या दोन तालुक्यात आपआपल्या विचारसरणीचे जतन करीत ठाम होते. आता कोणत्या पक्षात आहात, हे विचारावे लागते, अशी खंत व्यक्त केली.

कुडपण, उमरठ, रायगड किल्ला आणि प्रतापगडावरही त्याकाळी बांधकाम सभापती असलेल्या आमचे वडील स्व. प्रभाकर पाटील यांचे काम दिसून येते. त्यांच्यामागे शांताराम फिलसे या अर्थतज्ज्ञ स्वरूपाच्या सहकाऱ्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

रायगड जिल्हा परिषदेवर ‘सेवेचे ठायी तत्पर–पाटील प्रभाकर’ हा उल्लेख प्रवेशद्वारावर लिहिण्यामागे स्व.शांतारामभाऊंनी प्रभाकर पाटील यांचे कार्य जनमानसांपर्यत पोहोचावे, या हेतूने केला. प्रशासनावर पकड असल्यास राजकारण्यांना कसलीही अडचण येत नाही. बॅ.अंतुले यांनी मुख्यमंत्री असताना राज्यातील जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांना दालनात बोल–ावून एकेकाला तातडीने काय अपेक्षित आहे, हे विचारले असता प्रभाकर पाटील यांनी कुलाबाचे रायगड नामांतर करण्याची सुचना केली. बॅ.अंतुले यांनी तात्काळ राज्याच्या मुख्य सचिवांना बोलावून तसा अध्यादेश पारित करण्यास भाग पाडले.

पोलादपूर तालुक्यातील सवाद आणि कापडे तसेच महाड तालुक्यातील वरंध येथेही रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा उघडण्याचे प्रस्ताव असल्याने त्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आ.जयंत पाटील यांनी सांगितले. पुर्वी १६०० कर्मचारी असताना केवळ ३० शाखा होत्या आणि आपण कर्मचारीसंख्या कमी करून शाखांची संख्या वाढवल्याने ग्राहकसेवेला प्राधान्य देण्याची मानसिकता कर्मचारीवर्गात रूजली असल्याचे सांगून कोणतीही संस्था आपली खासगी मालमत्ता समजून त्याद्वारे ग्राहकसेवा केल्यास खर्च मर्यादित ठेवता येतात. आपण चेअरमन म्हणून बँकेची गाडी वापरत नसून विधानपरिषदेचे ज्येष्ठ सदस्य असूनही आमदारकीचे वेतन घेत नाही. सरकारी कार्यक्रमांमध्ये जेवण घेत नाही. टक्केवारी आणि बदल्यांची कामे आपण करीत नाही, असे सांगून आचरण स्वच्छ ठेवल्याने प्रशासनामध्येदेखील आपला दबदबा राहतो, असे सांगितले. सध्या मंत्रालयामध्ये कोणत्याही फायलींवर सह्या करण्याबाबत प्रशासन अनुत्सुक असल्याचे सहकारी व सत्तेमधील आमदारही सांगत असल्याने यावेळी आ.जयंतभाईंनी सांगून ही परिस्थिती लोकशाहीला नोकरशाही मारक ठरेल, अशी असल्याची चिंताही त्यांनी व्यक्त केली. पूर्वी पालकमंत्री आपणाशी चर्चा करून जिल्हा नियोजनाची बैठक घेत असत. अगदी पतंगराव कदमांनीही अनेकदा फोन करून अशा बैठकींबाबत पूर्वचर्चा केली. मात्र, मागच्या पालकमंत्र्यांना तसे कधीच करावेसे वाटले नव्हते, याचे आश्चर्य वाटत असल्याचे यावेळी आ.जयंत पाटील यांनी सांगितले.

# पंचायत समिती इमारत सजावटीत शिक्षकांचे योगदान

**दै.रायगड नगरी । कोर्लई**




ज्ञानदाना बरोबरच शिक्षकांचा सामाजिक कार्यात शिक्षकांचा मोठा सहभाग असतो. पंचायत समिती मुरुड येथील पंचायत समिती कार्यालय सुशोभीकरण करणे, सुविचार काढणे, लोगो तयार करणे, फलक लेखन करणे, चित्र काढणे आदी. बाबींनी माझी पंचायत समिती सुंदर पंचायत समिती हे ब्रीदवाक्य जपून शिक्षकांनी या कामात सहकार्य केले

यात चोरढे मराठी शाळेतील राजेंद्र नाईक, देवानंद गोगर, शाळा ताडगाव जगदीश चवरकर , शाळा चिकणी राजेंद्र साळावकर शाळा तळेखार हेमंत म्हात्रे , संतोष खैरे, राजेंद्र पाटील , अनंत थळे या शिक्षकांनी एक दिवस संपूर्णपणे पंचायत समिती सजावटीसाठी दिला. याअगोदर या शिक्षकांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालय सुशोभित केलेले होते याबाबत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी, गटशिक्षणाधिकारी बी.के.पाखरे यांच्या सूचनेनुसार हा उपक्रम राबविण्यात आला. असे शिक्षक जर सर्वच तालुक्यात कार्य करू लागले तर सर्वच पंचायत समिती सुंदर व सुरेख होतील.

सर्वसामान्य माणसांना प्रत्येक कक्ष समजण्यास सोपा जाईल तसेच एक आदर्श व देखणी वास्तू पंचायत समितीचे उभे राहील. शिक्षकांनी केलेले ज्ञानदाना बरोबरच हे कार्य अतिशय कौतुकास्पद असल्याचा गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी बी.के.पाखरे यांनी उल्लेख करून सर्व शिक्षकांचे सहकार्याबद्दल आभार मानले.

# प्रशासक सुरेखा भणगे यांच्या पुढाकाराने रस्त्यांच्या डागडुजीला सुरुवात

**दै.रायगड नगरी । माथेरान**

दरवर्षी पावसाळ्यात इथल्या मातीच्या रस्त्यांची मोठया प्रमाणावर धूप होत असते त्यासाठी पर्याय म्हणून सनियंत्रण समितीने याठिकाणी क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांना मान्यता दिलेली आहे.परंतु काही ठिकाणी जुन्याच पध्दतीचे रस्ते असावेत ज्यामुळे माथेरानच्या लाल मातीची ओळख संपुष्टात येणार नाही त्यासाठी काही भागात असेच लाल मातीचे रस्ते ठेवण्यात येत आहेत.

दरवर्षी पावसाळ्यात रस्त्यावरून पावसाळी पाणी वाहून जाते त्यामुळेच रस्त्यांची नेहमीच वाताहत होते. रस्त्यांवरील दगड माती वर आल्याने हातरीक्षा तसेच ज्या ज्या मुख्य पॉईंट्स कडे घोड्यांची वर्दळ असते पर्यटक सुध्दा पायी चालत निसर्गाचा आनंद घेतात त्याना चालताना खूपच त्रासदायक बनते याकामी नगरपरिषदेच्या उत्तम प्रशासक तथा मुख्याधिकारीसुरेखा भणगे (शिंदे) यांनी माथेरान मधील संपूर्ण भौगोलिक परिस्थिती जाणून घेत आगामी नाताळ सुट्टयांचा हंगाम लक्षात घेऊन ज्या ठिकाणी रस्त्यांची मोठया प्रमाणावर वाताहत झाली आहे त्याठिकाणी रस्त्यांच्या डागडुजी साठी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना देत युद्धपातळीवर कामे सुरू केली आहेत.

जिथे जिथे रस्त्याला खड्डे पडले आहेत त्याठिकाणी दगड मातीच्या भरावाने रस्ते पूर्ववत केले जात आहेत. याकामी बांधकाम अभियंता स्वागत बिरंबोले, अर्जुन पारधी यांच्या देखरेखीखाली चांगल्या दर्जाचे रस्त्यांची कामे पूर्ण केली जात आहेत. प्रशासक सुरेखा भणगे यांच्या कार्यपद्धतीमुळे श्रमिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



> या गावासाठी मनाने आणि विचाराने एक महिला अधिकारी लाभलेली आहे एखाद्या पुरुषाला लाजवेल असं काम या गावांमध्ये होत आहे सर्वसाधारण माणूस पण गेला त्यांच्याकडे काम घेऊन तरीही त्या माणसाचं कुठलंही काम कधीही अडत नाही प्रथमता आणि पहिल्यांदाच असे अधिकारी या गावाला लाभलेले आहेत या गावात घोडेवाल्यांना चांगले रोड नव्हते मॅडम स्वतः पॉईंटवर फेरफटका मारतात सात पॉइंट असो पाचं पॉइंट जिथे जिथे त्यांना रोड खराब दिसतो लगेच आपल्या कर्मचाऱ्यांना सांगून त्या रोडचे डागडुजी होऊन रोड पूर्वपदावर येऊन घोडेवाल्यांना रिक्षावाल्यांना आणि पर्यटकांना चालण्यासाठी रोड सोयीस्कर होतो रोडची परिस्थिती पाहता माथेरान च्या प्रशासक सुरेखा भणगे यांनी या गावातील मातीचे रोड चांगल्या प्रकारे बनवण्याचा मनात निर्धार केला आहे आम्हाला चांगले रोड मिळतील याची आम्हाला अपेक्षा आहे आणि नक्कीच रस्त्यावर आपले पोट भरणारे घोडेवाले असो रिक्षावाले पर्यटक असो यांना या चांगल्या रोडचा आनंद घेता येईल.
>
> **राकेश कोकळे, अश्वपालक माथेरान**

# राजकीय पक्षांच्या मोर्चेबांधणीने ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये रंगत

**दै.रायगड नगरी । उरण**

१८ डिसेंबर रोजी होवू घातलेल्या १८ ग्रामपंचायतीच्या रणधुमाळीसाठी राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे. सदर ग्रामपंचायतीमध्ये दरवर्षी विकास कामांसाठी लाखोंचा निधी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून उपलब्ध होत असल्याने हवेसे, गवसे ही आप आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी राजकीय पक्षांच्या नेत्यांचे उंबरठे झिजवत असल्याने चित्र पहावयास मिळत आहे. एकंदरीत ग्रामपंचायत निवडणुकीत रंग भरु लागला आहे.

उरण तालुक्यात एकूण ३३ ग्रामपंचायती असून त्यापैकी जसखार, करळ,पाणजे, नवीन शेवा, घारापुरी, डोंगरी, बोकडविरा, भेंडखळ, नवघर, पागोटे, पुनाडे, धुतूम, रानसई, कळंबुसरे, पिरकोन, सारडे, वशेणी अशा १८ ग्रामपंचायतीच्या निवडणुका १८ डिसेंबर रोजी होत आहेत. या निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना, शेकाप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे यांनी गावा गावात भक्कम मोर्चे बांधणी करण्यासाठी सुरुवात केली आहे.

या १८ ग्रामपंचायतीचा सरपंच हा थेट जनमानसातून निवडून येणार आहे. त्यामुळे होऊ घातलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत युती, आघाडीच्या माध्यमातून आपल्याच पक्षाला सरपंच पदांची उमेदवारी मिळावी यासाठी धडपड करताना सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी दिसत आहेत.

परंतु ग्रामपंचायतीचे राजकारण हे व्यक्तीगत,संबंधांवर आधारित असल्याने विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी गावा–गावातील मोठ्या कुटुंबांना उमेदवाऱ्या देण्याकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे १८ डिसेंबर चा निवडणुकीचा फड जबरदस्त रंगणार असे चित्र दिसू लागले आहे.


अ‍ॅड.वसीम धुरू पटेल

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

क्रि.चौ.अर्ज क्र.११७६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२२/१२/२०२२

MRS ANJUM JAFAR TERWA — Applicant
V/S
Panvel Municipal Corporation — Respondent

ज्याअर्थी अर्जदार यांच्या आई पै.बिल्कीस अब्दुल कादीर बुबेरे दि.०१/०१/१९५९ रोजी मौजे : पाडा मोहल्ला पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी जन्म झाला असून त्यांच्या जन्माची नोंद पनवेल नगरपालिका यांचे दप्तरी झाली नसल्याने त्यांचे जन्माची नोंदीकरिता अर्जदार प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब पनवेल यांच्या कोर्टात सदरचा चौकशी अर्ज दाखल केला असून त्याच्या जन्माची नोंदणी बाबत कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष हरकती घेतल्या गेल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची लागलीच कारवाई करेल आणि ते जर अर्जदार यांच्या आई पै.बिल्कीस अब्दुल कादीर बुबेरे यांच्या मृत्यूचा दाखला घेण्यास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांच्या मृत्यूच्या नोंदणीचा मंजूर करेल याची दखल घ्यावी.

आज दि.१८/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक प्र.वर्ग न्या.सो.पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक प्र.वर्ग न्या.सो.पनवेल



मा.पांडे साहेब

अर्जदारातर्फे वकील
अ‍ॅड.नरेश टी. म्हसकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

क्रिमिनल एम.ए.क्र.१२६४/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२९/११/२०२२

श्री.विनायक तुकाराम भोईर
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.भिंगार, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत भिंगार
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.विनायक तुकाराम भोईर, रा.भिंगार, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड यांचा जन्म दि.०१/०६/१९७९ रोजी किंवा त्या सुमारास मौजे : भिंगार, ता.पनवेल येथे झाला आहे आणि अर्जदार यांनी त्यांचे जन्माची नोंद होणेकरिता आदेश मिळणेबाबत पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात सदरचा चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार श्री.विनायक तुकाराम भोईर हे वर नमूद ठिकाणी जन्मलेले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यांचे जन्माची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.१७/११/२०२२ रोजी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल



सोनावणे साहेब

अ‍ॅड.प्रिया मोरे

**जाहीर नोटीस**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१५४९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२०/१२/२०२२

१) श्रीमती.वृषाली सुभाष यादव
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.अजिंक्य सुभाष यादव
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.अजय सुभाष यादव
अज्ञान तर्फे पालनकर्ती आई अर्जदार नं.१
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.फ्लॅट नं.४०६, ४ था मजला,
गुरुकृपा अपार्टमेंट, प्लॉट नं.१७,
सेक्टर ९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२, ३ यांचे वडील कै.सुभाष दत्तात्रय यादव यांचे दि.०९/०८/२०२० रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे आजाराने निधन झाले. मयत कै.श्री.सुभाष दत्तात्रय यादव यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मालमत्तेचे वर्णन : फ्लॅट नं.४०६, ४ था मजला, गुरुकृपा अपार्टमेंट, प्लॉट नं.१७, सेक्टर ९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

**मुल्यांकन : रु.४,५०,०००/– (रु.पाच लाख पन्नास हजार मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमणे वारसांचा दाखला देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



गुन्नाल साहेब

अ‍ॅड.प्रिया मोरे

**जाहीर नोटीस**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१५५०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२०/१२/२०२२

१) श्रीमती.सुनिता दिपक बोचरे
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.ओमकार दिपक बोचरे
वय : २३ वर्षे, धंदा : नोकरी
३) सुकन्या दिपक बोचरे
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.फ्लॅट नं.३०१, ३ रा मजला,
गुरुकृपा अपार्टमेंट, प्लॉट नं.१७,
सेक्टर ९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२, ३ यांचे वडील कै. श्री.दिपक बंडू बोचरे यांचे दि.२८/०७/२०२० रोजी फ्लॅट नं.३०१, ३ रा मजला, गुरुकृपा अपार्टमेंट, प्लॉट नं.१७, सेक्टर ९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे आजाराने निधन झाले. मयत कै.श्री.दिपक बंडू बोचरे व त्यांची पत्नी श्रीमती.सुनिता दिपक बोचरे यांच्या नावे ५०%–५०% यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः–

**मालमत्तेचे वर्णन : फ्लॅट नं.३०१, ३ रा मजला, गुरुकृपा अपार्टमेंट, प्लॉट नं.१७, सेक्टर ९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

**मुल्यांकन : रु.५,३५,०००/– (रु.पाच लाख पस्तीस हजार मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमणे वारसांचा दाखला देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## पनवेलमध्ये वास्तू हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेडने सुरू केली नवीन शाखा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशातील अग्रगण्य परवडणाऱ्या वाजवी किंमतीतील गृहनिर्माण वित्तीय कंपन्यांपैकी एकवास्तू हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेडने पनवेलमध्ये नवीन शाखा सुरू करून नवी मुंबई विभागात आपले स्थान आणखी मजबूत केले आहे. यासह वास्तू हाऊसिंग फायनान्सचे संपूर्ण भारतात १५७ शाखांचे नेटवर्क असणार आहे.

विशेषत: कोविड नंतरच्या काळात कंपनीला नवी मुंबई प्रदेशात परवडणाऱ्या घरांची मागणी अधिक दिसून आली आहे. त्यामुळे कर्जदारांच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी कंपनीने नवीन शाखेचे अनावरण केले. मजबूत पायाभूत सुविधा, पुरेशी वाहतूक सेवा, दीर्घकालीन आर्थिक वाढ यासह नवीन पनवेल, खारगर, कामोठे, तळोजा आणि उलवे हा परिसर परवडणाऱ्या घरांसाठी सर्वाधिक आवडीचे स्थान म्हणून उदयास आला आहे. पनवेलमध्ये नवीन शाखा सुरू केल्यामुळेवास्तू पनवेलमधील वंचित ग्राहक वर्गाला जलद कर्जसुविधा प्रदान करेल. हा ग्राहक वर्ग मध्यम विभागातील गृहखरेदी प्राधान्याने करताना दिसत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेचा विस्तार आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट सारख्या आगामी प्रकल्पांमुळे परवडणाऱ्या घरांची मागणी वाढेल आणि त्यामुळे मागणी आणि वापर, रोजगार, पायाभूत सुविधांमध्ये आणखी वाढ होईल. नवीन शाखा पनवेल, खारघर आणि लगतच्या भागांसह नवी मुंबई परिसरातील लोकांच्या गृहकर्ज, क्रेडिट गरजा पूर्ण करेल.

वास्तू हाऊसिंग फायनान्सचे संस्थापक, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारीसंदीप मेनन म्हणाले, नवी मुंबईतील अनेक संभाव्य खरेदीदारांसाठी एमएमआरमधील पनवेल परिसरातील भाग हा परवडणाऱ्या घरांसाठी निवडलेल्या सर्वोच्च पर्यायांपैकी एक आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# आगामी रहाटाड ग्रामपंचायत थेट सरपंचपदासाठी राजकीय पक्षांची मोर्चेबांधणी

**दै.रायगड नगरी । तळा**

ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये तळा तालुक्यातील एकमेव राहटाड ग्रामपंचायत येत असल्यामुळे येथे सर्व राजकीय पक्षांकडून मोर्चे बांधणीला सुरवात झाली आहे ईच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधुन तयार असताना मात्र राजकीय पक्षांनी सरपंच यावेळेस पुन्हा जनतेतुन निवडला जाणार असल्यामुळे सावध भुमिका घेत सर्वसमावेशक जनतेच्या हिताची कामे करणारा चेहरा शोधण्यास सुरवात केली आहे. नवीन सरकारने ग्रामपंचायतींचे सरपंच पद हे थेट जन-तेतुन निवडुन जाणार असल्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे या निर्णयानुसार तळा तालुक्यातील रहाटाड या एकमेव ग्रामपंचायतीमध्ये गावातील ग्रामस्थांना आपला सरपंच थेट निवडुन देण्याचा बहुमान मिळणार असल्याने गाव विकासाला पुन्हा गती मिळण्याबरोबर सरपंच पदाचे महत्व आता वाढले असुन या निवडणुकांमध्ये प्रत्येक जण आपली प्रतिष्ठा पणाला लावणार असल्याचे बोलले जात आहे.

ग्रामपंचायत स्तरावर राजकीय पक्षांची घु-सखोरी व प्रत्येक गावात झालेले गट तट यामुळे पुर्वी होणरया बिनविरोध निवडणुका ईतिहास जमा होऊन प्रत्येक ग्रामपंचायतीत निवडणुका लागण्याची परंपरा तळा तालुक्यात सुरु झाली राहटाड ग्रामपंचायतीत गेली अनेक वर्षे राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे वर्चस्व आहे.परंतु मागील काही महिन्यात पुलाखालून बरेच पाणी गेले असून भारतीय जनता पार्टीने येथे चंचू प्रवेश केला आहे. मागील पाच वर्षापूर्वी थेट सरपंच पदी निवडून आलेले चांगदेव पाटील आणि त्यांचे सहकारी यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत भाजपा येथे स्पर्धेत राहणार असल्याचे बोलले जात आहे. रहाटाड येथे शिवसेनेचे देखील मतदार असून भाजपा आणि शिवसेना एकत्र झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेसला टक्कर देऊ शकतात. राष्ट्रवादी काँग्रेसने देखील ही ग्रामपंचायत पुन्हा आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी जय्यत तयारी सुरू केली आहे.

ग्रामपंचायत निवडणुका तोंडावर आल्या असतानाच शासनाने सरपंच पदाची निवडणुक जनतेतुन जाहीर करण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे मतदारांना भविष्यातील विकासकामांची माहीती ग्रामपंचायतीचे योग्य नियोजन व आपणच सरपंच पदासाठी कसे योग्य आहोत हे पटवून द्यावे लागणार आहे १९९५ नंतर ज्यांचा जन्म झाला आहे त्यांना सातवी पास असल्याची अट शासनाने घातली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील राजकीय पक्षातील जेष्ठ लोकांना रान मोकळे झाले असुन घराणेशाहीची परंपरा येथेही पहावयास मिळणार असुन मीच कसा या पदासाठी दावेदार आहे हे सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न प्रत्येक पुढारी करणार असला तरी गा-वागावातील राजकारण चांगलेस ढवळुन निघणार आहे. नव्या निर्णयामुळे जेष्ठांसहीत युवकांनाही सरपंचपदाचे डोहाळे आत्तापासुनच लागले आहेत. अनेकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे तर अनेकांनी याची धास्ती घेतली आहे एकंदरित राजकीय पक्ष या निवडणुकीसाठी जोमाने उतरणार असुन सध्या रहाटाड ग्रामपंचायतीकडे सर्वांनी लक्ष वेधले असतानाच तालुक्यात उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसल्याने तरुण वर्ग पत्नी सहित मुंबई येथे स्थानिक झाले आहेत त्यामुळे गावात त्यांचे वडीलधारी वयस्कर सध्या रहिवाशी आहेत त्यामुळे ग्रामपंचायत थेट सरपंच पद आणि सदस्य पदासाठी उमेदवार शोधण्यात राजकीय पक्षाची मोठी तारांबळ उडणार आहे.

## शेखर पाटील यांची भाजपातून हकालपट्टी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पक्षविरोधी कार्यवाही केल्यामुळे उरण तालुका युवा मोर्चाचे अध्यक्ष शेखर जगन्नाथ पाटील यांची भारतीय जनता पार्टीतून हकालपट्टी करण्यात आली आहे.

शेखर पाटील हे युवा मोर्चाचे पदाधिकारी असतानाही मात्र त्यांनी पक्षाची जबाबदारी पार न पाडता सतत पक्षविरोधी कारवाई केली आहे. त्याचबरोबर पक्षाला कोणतीही सुचना न देता बोकडवीरा ग्रामपंचायतीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकापक्षासोबत परस्पर युती घालण्याचा घाट घातला. त्यामुळे विरोधी पक्षाला शेखर पाटील यांनी उघडपणे सहकार्य केल्याचे स्पष्ट झाले आहे. पक्षविरोधी कारवायांमुळे पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचे काम त्यांनी करत त्या विभागात पक्षाचे खच्चीकरण करण्याचे जाणूनबुजून काम केले. या संदर्भात वारंवार समज देऊनही शेखर पाटील यांच्या वर्तनात सुधारणा न झाल्याने भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर व युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी शेखर पाटील यांचे सहा वर्षांसाठी निलंबन करून पक्षातून हकालपट्टी केली आहे.

## माथेरानच्या प्राचार्य गव्हाणकर शाळेच्या मुलींची तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

तालुक्यातील कर्जत कडाव( गौळवाडी) येथे आयोजित करण्यात आलेल्या धावण्याच्या स्पर्धेत माथेरान मधील प्राचार्य गव्हाणकर शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

१४ वयोगटात प्राजक्ता प्रशांत कदम दुसरी तर १७ वर्षायाखालील वयोगटात हर्षाली संतोष ढेबे पहिली आली दोघी अलिबाग येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धे साठी पात्र झाल्या आहेत केंद्रप्रमुख नारायण सोनवणे सरांनी दोघीना रु.५००/- पारितोषिक देऊन सन्मानित केले.


गुरुवार पासून राज्य सरकारची कर्जत तालुक्याची ऐथलेटिक्स स्पर्धा कडाव येथील गौळवाडी या शाळेच्या मैदानावर सुरवात झाली गुरुवारी मुलांच्या धावण्याच्या स्पर्धा पार पडल्या स्मरण नरेश काळे यांनी १०० मीटर मध्ये विजयी आघाडी घेतली होती तर २०० मीटर मध्ये कार्तिक नरेश काळे पहिल्या फेरीत प्रथम आला तर अंतिम फेरीत त्यांना दुसऱ्या धावपटू चा धक्का लागल्याने विजयी होऊ शकले नाहीत .त्यांच्या सह अथर्व सूर्यकांत कारंडे, निखिल राजेंद्र केलगणे,फरहान समीउल्ला शेख, दीपक बाळू आखाडे, रुचित रमेश मेने, अलिझा जहुर चिपाडे, मानसी राजेंद्र बल्लाळ यांनी देखील भाग घेतल्याने मोठा अनुभव घेता आला.

शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले व शिक्षक संघपाल वाठोरे यांनी स्पर्धेच्या प्रवेशिका दाखल करणे विद्यार्थ्यांना स्पर्धेस घेऊन जाणे हे महत्वपूर्ण काम केल्याने विद्यार्थ्यांना स्पर्धेचा चांगला अनुभव घेता आला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माथेरान मधील स्थानिकांनी विशेष कौतुक केले तर धनगर समाज अध्यक्ष दीपेश ढेबे यांनीही प्रशिक्षक सुनील शिंदे, संघपाल वाठोरे, वर्षा शिंदे, त्याचप्रमाणे माथेरानचे भूमिपुत्र कर्जत तालुका केंद्रप्रमुख नारायण सोनवणे यांचे खासकरून अभिनंदन केले यावेळी धनगर समाज माजी अध्यक्ष राकेश कोकळे, शैलेश ढेबे, करन जानकर आदी उपस्थित होते.



## मुरूड-एकदरा परिसराला विषारी वायूचा विळखा

### नागरिक व ग्रामस्थांमध्ये संताप



**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरूड-एकदरा परिसरात पहाटेच्या वेळी धुक्याऐवजी प्लॅस्टिकच्या विषारी धुराची चादर पसरत आहे. या परिसराला विषारी वायूचा विळखा पडत आहे. मॉर्निंग वॉक घेणाऱ्यांना ऑक्सिजन ऐवजी प्रदुषित विषारी वायुचा श्वास घ्यावा लागतो आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी व ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

या परिसरात भंगारवाले भंगारमध्ये मिळणाऱ्या केबल जमा करून यातील तांब्याच्या (कॉपर) तारा काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात जाळ करून प्लॅस्टिक पासून निर्माण होणारा विषारी वायू सोडून मोठ्या प्रमाणात प्रदूषण करीत आहेत. या धुराचे प्रमाण इतके असते की संपुर्ण परिसरात धुक्याऐवजी विषारी धुराची चादर पसरलेली पहावयास मिळते आहे.

पहाटे स्वच्छ हवेत ऑक्सिजन मिळवण्यासाठी अनेक नागरिक व ग्रामस्थ फिरायला येत असतात. या फिरणाऱ्यांना ऑक्सिजन ऐवजी प्रदुषित विषारी प्लॅस्टिक धुराचा श्वास घ्यावा लागतो आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी व ग्रामस्थांनी प्रचंड संताप व्यक्त केला आहे. आणि या प्रदुषण करणाऱ्या भंगारवाल्यांवर प्रशासनाने कडक कारवाई करावी अशी मागणी करीत आहेत.

## कबड्डी स्पर्धेत श्रमिक विद्यालय चिल्हेचे सुयश

**दै.रायगड नगरी । खांब**

रोहे तालुका पं.समिती अंतर्गत संपन्न होत असलेल्या विविध स्पर्धे तंर्गत नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथील १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने अंतिम सामन्यात सर्वोत्तम खेळ करीत विजेतेपद पटकावले आहे.

या विद्यालयाने कबड्डी खे-ळातील आपली उज्ज्वल परंपरा कायम राखित या वर्षीच्या चिंचवली हायस्कूल येथे संपन्न तालुकास्तरीय स्पर्धेत अंतिम सामन्यात सानेगाव हायस्कूलचा पराभव करुन हे यश संपादित केले आहे.मुलींच्या संघाने मिळविलेल्या या सुयशाबद्दल संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे व संस्थेचे सर्व संचालक मंडळ व मुख्याध्यापक दिपक जगताप आणि सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तसेच विभागातील क्रीडाप्रेमी नागरिक व समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांनी मुलींच्या या संघाचे अभिनंदन व्यक्त करून पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## अलिबाग शेतकरी भवन येथे कोव्हिड योद्धांचा मेळावा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अलिबाग येथील स्थळ: शेतकरी भवन, अलिबाग नगरपालिकेसमोर येत्या रविवारी सकाळी ११ वाजता कोविड योद्धांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदर मेळाव्याला शेतकरी कामगार पक्षाचे नेते, आमदार भाई जयंत पाटील प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. कॉम्रेड मनोज यादव, अध्यक्ष व कॉम्रेड जगनारायण गुप्ता (कहार) सचिव म्युनिसिपल कामगार एकता युनियन, उपाध्यक्ष कॉम्रेड प्रमोद नवार, कॉम्रेड सुशिल देवरुखकर, कॉम्रेड अशोक पवार, अभिजित जाधव हे मार्गदर्शक आहेत.

अलिबाग कोरोना महामारीतून बाहेर पडून आपण सारेजण मोकळा श्वास घेऊ लागलो आहोत. या महामारीत अनेकांचे जीव केवळ टांगणीलाच लागले नव्हते, तर कुणालाही आपला जीव वाचेल याची शाश्वती नव्हती. रक्ताची नाती कोव्हीड रुग्णाला साधा स्पर्शही करायला तयार नव्हते. अशा वेळी आपल्या प्राणाची पर्वा न करता ज्या कोव्हीड योध्दाने रुग्णांची सेवा केली. त्या सेवेला तोड नाही. आपल्या प्राणाची बाजी लावून ज्या तरुण- तरुणींनी कोव्हिड काळात युध्द पातळीवर काम केले. त्यांच्यासाठी आता काही करायची वेळ आली आहे.

या सर्व कोव्हिड योद्धांना बोनस अथवा बक्षीस म्हणून किमान २५ हजार रुपये देण्यात यावे. तसेच नगरपालिका, महानगरपालिका व अन्य शासकिय रुग्णालये व अन्य ठिकाणी सामावून घेण्यात यावे, अशी मागणी म्युनिसिपल कामगार एकता युनियन करीत आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योद्धांना शासकीय नोकरीत सामावून घेण्यासाठी प्राधान्य देण्याची घोषणा केली आहे. त्यांचे म्युनिसिपल कामगार एकता युनियन स्वागत करीत असतानाच या घोषणेची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी करीत आहोत. कोव्हिड योध्दांना न्याय देण्यासाठी अन्य त्यांना खंबीरपणे साथ देण्यासाठी राज्यभर कोव्हिड योद्धांचे मेळावे घेत आहे. या मेळाव्यात उत्फूर्त पाठिंबा मिळत आहे. २४ सप्टेंबर २०२२ रोजी मुंबईत शिरोडकर सभागृहात झालेल्या मेळाव्यात अपेक्षेपेक्षा अधिक प्रतिसाद मिळाला. यानंतर उत्तर महाराष्ट्रातील कोव्हिड योद्धांचा मेळावा नाशिक येथे दि. ६.११.२०२२ रोजी सीटु, कामगार भवन, खुटवड नगर, नाशिक, तसेच रविवार दि. १३.११.२०२२ रोजी कै. वा. ब. गोगटे विद्यानिकेतन क्र. ७, ३१८, नारायण पेठ, पूणे येथे आयोजित केला होता. त्यानुसार रविवार दि. २०.११.२०२२ रोजी सकाळी ११ वाजता अलिबाग येथील शेतकरी भवन, अलीबाग नगरपालिकेसमोर, आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यात कोरोना महामारीत जे तरुण-तरुणी शासकीय निमशासकीय अथवा महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये रुग्ण सेवेचे काम करीत होते त्या सर्वांना सेवेत कायम स्वरुपी सामावून घेण्यात यावे.

कोव्हिड योद्धांना जाहिर करण्यात आलेला 'कोव्हिड भत्ता' त्वरित देण्यात यावा. कोव्हिड योध्दांना नोकरीत प्राधान्य देण्यात यावे, मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी. अशी मागणी म्युनिसिपल कामगार एकता युनियनच्यावतीने करण्यात येणार आहे

या मेळाव्यासंदर्भात अंधुक माहिती करीत अविनाश गोप-ाळे - ९९३००७९३५२ / गिरीश खोत - ९५०३६३००५६ / प्रतिक महाले ८८६२०६१९९० यांच्याशी संपर्क साधावा. टिप - कोव्हिड योद्धे यांनी सभासद नोंदणीसाठी खालील कागदपत्रे सोबत आणावीत. १) ओळखपत्र, नियुक्तीपत्र, मानधन नोंद (बँक पासबुक), प्रमाणपत्र, आधारकार्ड.

# सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देणार

**दै.रायगड नगरी । रोहा**

रायगड जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक सेवाभावी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी बुधवार दि.१६ नोव्हेंबर रोजी अलिबाग येथील कार्यालयात रा. जि.प मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांची भेट घेतली. यावेळी पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांना भेडसावणाऱ्या सर्व प्रश्नांची माहिती त्यांना दिली.यावेळी त्यांनी आदरपूर्वक सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न जाणून घेत आगामी काळात तुमचे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्य देणार असे आश्वासन भेटी वेळी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले.

यावेळी संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम ग. खांडेकर,जिल्हा सरचिटणीस रमेश धों. लखिमले, सल्लागार वसंत ठ. शिंदे,जेष्ठ सदस्य बाळकृष्ण वी. पवार, नारायण शं.पाटील,रोहा तालुकाध्यक्ष गजानन र.गुरव, जिल्हा परिषद शिक्षक क्रिडा समिती सदस्य अजय कापसे आदी उपस्थित होते.



रायगड जिल्ह्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांना तालुकास्तरावर त्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवर समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत.यासाठी पंचायत समिती कार्यालयांकडुन सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांची गहाळ झालेली सेवा पुस्तके मिळत नसल्यामुळे दुय्यम सेवा पुस्तकांना मंजुरी द्यावी,१३/५/१४ रोजी सेवानिवृत्त शिक्षकांना निवड श्रेणी मंजूर झाली मात्र आजही काही वंचीत शिक्षकांना त्याचा लाभ मिळत नाही, १९७२ नंतर सेवेत लागलेल्या अनट्रेंड शिक्षकांना कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे पेन्शन मजूर व्हावी, यासोबतच दर महा अनियमित होणारी पेन्शन एक किंवा दोन तारखेलाच मिळावी असे आपले प्रमुख प्रश्न मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह जिल्हा शिक्षण अधिकारी सौ.गुरव यांची भेट घेत मांडले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अत्यंत जिव्हाळ्याने सेवानिवृत्त शिक्षकांच्या व्यथा जाणून घेत त्या सोडविण्याचे आश्वासन दिल्यामुळे समाधान व्यक्त होत आहे.

## खड्ड्यांची दुरुस्ती करण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहतीमध्ये ठिकठिकाणी पडलेल्या रस्तावरील मोठमोठ्या खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी कळंबोली शिवसेनेच्या वतीने पनवेल महानगर पालिका शहर अभियंता यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे . शिवसेना कळंबोली विभाग प्रमुख महेश गुरव ,नरेंद्र सिंग होठी व सविंदर सिंग भीडर यांनी पनवेल महानगर पालिका शहर अभियंता यांची भेट घेऊन त्यांना सांगितले की , कळंबोली शहरामध्ये मोठया रस्त्याचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. ठिकठिकाणी मोठे मोठे खडडे पडले आहेत त्यामुळे वाहनचालकांना मोठया प्रमाणात त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तसेच छोटे मोठे अपघात सातत्याने घडत आहेत. तरी डी मार्ट नाका ते रोडपाली तलावापर्यंत मोठया प्रमाणात रस्ता खराब झालेला आहे तरी रस्ता त्वरीत दुरुस्त करणे आवश्यक आहे समजा तसे न झाल्यास आपणांस जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल याची आपण नोंद घ्यावी. तरी योग्य ते सहकार्य करावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

## गोवरची लक्षणे आढळल्यास आरोग्य केंद्राशी संपर्क साधण्याचे डॉ. महेश मेहता यांचे आवाहन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गोवर विषाणूपासून होणारा आजार असून गोवर विषाणू रुग्णांच्या खोकल्याद्वारे हवेमार्फत पसरतो व संपर्कात आलेल्या व्यक्तीच्या श्वसन संस्थेतून शरीरात प्रवेश करतो. या रोगाची लक्षणे आढळल्यास घाबरून न जाता जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा व काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश मेहता यांनी केले आहे.

ताप येणे, शरीरावर लाल पुरळ येणे, डोळे लाल होणे ही गोवरची लक्षणे आ-हेत. गोवरच्या विषाणूंनी शरीरात प्रवेश केल्यानंतर सात ते दहा दिवसांनी लक्षणे दिसण्यास सुरुवात होतात. सुरुवातीस ताप व खोकला, सर्दी, डोळे लाल होणे यापैकी एक-दोन किंवा तीनही लक्षणे असू शकतात. दोन-चार दिवसानंतर सर्व अंगावर पुरळ येणे, ते कानाच्या मागे, चेहरा, छाती, पोटावर पसरतात. त्यामुळे वेळीच काळजी घेऊन संभाव्य धोके टाळता येऊ शकतात, असे आरोग्य विभागाने कळविले आहे.

गोवर झालेल्या रुग्णाच्या शरी-रातील अ जीवनसत्वाचे प्रमाण कमी होते. अ जीवनसत्व कमी झाल्याने रुग्णाला डोळ्यांचे आजार व अतिसार, न्युमोनिया, मेंदूज्वर असे आजार होऊ शकतात. गोवर झालेल्या रुग्णास लागोपाठ दोन दिवस अ जीवनसत्वाची मात्रा दिल्यास हे आजार होण्याची शक्यता कमी असते असेही डॉ. मेहता यांनी सांगितले.

गोवर रोग टाळण्यासाठी लसीकरण प्रभावी मार्ग असून प्रत्येक शासकीय रुग्णालयांमध्ये लस उपलब्ध आहे. लसीकरणाच्या वेळापत्रकाप्रमाणे लसीकरण केल्यास गोवर रोग टाळता येतो. ज्या बालकांचे गोवर/रुबेला लसीकरण झाले नसेल त्यांचे लसीकरण करून घेणे आवश्यक आहे.

लसीचा पहिला डोस ९ महिने पूर्ण ते १२ महिने व दुसरा डोस १६ ते २४ महिने या वयोगटात देण्यात येतो. गोवरची लक्षणे आढळल्यास त्वरित आपल्या जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा व डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहनही डॉ. मेहता यांनी केले.